| MHPA060013512020 | |
|---|---|
| | दाखल तारीख : ०५/१०/२०२० |
| | नोंदणी तारीख : ०५/१०/२०२० |
| | निकाल तारीख : २१/०६/२०२४ |
| | कालावधी : ०३ **वर्ष, ०८ महिने,१६ दिवस.** |

**नि.फौ.ख.क्रमांक २१७/२०२०**

**फॉर्म नंबर XXXII**

**भाग (अ)**

**(न्यायनिर्णयाचे शिर्षक पृष्ठ )**

**फौजदारी नियमावलीचे परिच्छेद ४४(i) प्रकरण vi**

| | |
|---|---|
| | **न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, न्यायालय क्र.०३, हिंगोली यांचे न्यायालयात.**<br>**(पिठासीन अधिकारी आय.जे.ठाकरे)** |
| | प्रथम खबर अहवाल क्र. १५१/२०२०,<br>कलम : ३२५,४४७,३२३,५०६,५०६(२) भारतीय दंड विधान,पोलीस स्टेशन बासंबा |
| अभियोगपक्ष : | महाराष्ट्र शासनातर्फे,<br>पोलीस ठाणे अधिकारी, पोलीस ठाणे,बासंबा, ता.जि.हिंगोली. |
| फिर्यादी तर्फे वकील: | सौ. भटट्ट मॅडम विशेष सहायक सहकारी अभियोक्ता |
| आरोपी | १– विलास शिवराम सोनटक्के, वय ३३ वर्षे,<br>रा.लोहरा, ता.जि.हिंगोली |
| आरोपी तर्फे वकील: | ॲड. बी.बी.खराटे |

**भाग (ब)**

**फौजदारी नियमावलीचे परिच्छेद ४४(ii) प्रकरण Vi**

| | |
|---|---|
| गुन्हयाचा दिनांक | २८/०८/२०२० |
| प्रथम खबर अहवालचा दिनांक | २८/०८/२०२० |
| दोषारोप पत्र दिनांक | ०५/१०/२०२० |
| दोषारोप मांडणी दिनांक | ०४/०४/२०२० |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | ०४/०४/२०२० |
| न्यायनिर्णय राखुन ठेवल्याचा दिनांक | –– |

| | |
|---|---|
| न्यायनिर्णयाचा दिनांक | २१/०६/२०२४ |
| शिक्षेच्या आदेशाचा दिनांक, जर असेल तर | -- |

## आरोपीचा तपशील

| आरोपीचा क्रमांक | आरोपीचे नाव | अटकेचा दिनांक | जामीनावर मुक्त झाल्याचा दिनांक | गुन्हयाचे दोषारोप | निर्दोष किंवा दोषी | दिलेली शिक्षा | कलम ४२८ फौ.प्र.सं चे उददेशाने खटल्या दरम्यान अटकेचा गेलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | विलास शिवराम सोनटक्के | -- | २६/०३/२०२४ | भा दं सं कलम ३२५,४४७,३२३, ५०४,५०६, (२) | निर्दोष | -- | -- |

## भाग (क)

## फौजदारी नियमावलीचे परिच्छेद ४४(iii) प्रकरण Vi

## अभियोग / बचाव/ न्यायालयीन साक्षीदारांची यादी

### अ. अभियोगपक्ष

| क्रमांक | नाव | पुराव्याचे स्वरूप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार) इतर साक्षीदार ) |
|---|---|---|
| अ.सा. ०१ | गजानन शिवराम सोनटक्के | फिर्यादी |

### ब. बचावपक्षाचे साक्षीदार जर असेल तर

| क्रमांक | नाव | पुराव्याचे स्वरूप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार) इतर साक्षीदार ) |
|---|---|---|
| ब.सा. | -- | -- |

### क. न्यायालयीन साक्षीदार जर असेल तर

| अनु क्र. | नाव | पुराव्याचे स्वरूप<br>(प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार) इतर साक्षीदार ) |
|---|---|---|
| न्या. सा. | -- | -- |

## अभियोग/बचाव/न्यायालयीन निशाणीची यादी

### अ. अभियोगपक्ष :

| अनु.क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| ०१ | अ. सा. ०२ निशाणी क्र. २४ | फिर्याद |

### अ. बचावपक्ष :

| अनु.क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| -- | -- | -- |

### क. न्यायालयीन निशाणी :

| अनु.क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| -- | -- | -- |

### ड. वस्तु निशाणी :

| अनु.क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|

१) आरोपी विरुध्द भारतीय दंड संहितेचे कलम ४४७,३२५,३२३,५०४, ५०६(२) या दोषारोपाकरीता शिक्षेस पात्र अपराधाबाबत संपरिक्षा चालविण्यात आली आहे.

२) अभियोगपक्षाची थोडक्यात हकीकत अशी की, दिनांक २७/०८/२०२० रोजी मौजे लोहरा येथे १४.०० वाजेच्या सुमारास फिर्यादी गजानन शिवराम सोनटक्के हा त्याचे शेतात पाणी टाकण्याचे काम करीत होता. त्याच्या शेतात आरोपी विलास आला व त्याला उसने पैसे मागू लागला. फिर्यादीने पैसे न दिल्यामुळे आरोपीने त्याच्या दंडावर काठीने मारहाण केली. त्यामुळे फिर्यादीच्या दंडाचे हाड मोडले व फ्रॅक्चर झाले. तसेच फिर्यादीस लाथाबुक्याने मारहाण केली व जिवे मारण्याची धमकी दिली. म्हणुन फिर्यादीने आरोपी विरुध्द बासंबा पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली.

३) फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून बासंबा पोलिसांनी गुन्हा क्रमांक १५१/२०२० नोंद केला व तपासाअंती, आरोपींविरूध्द भारतीय दंड संहितेचे कलम ४४७,३२५,३२३,५०४, ५०६(२) अन्वये शिक्षापात्र अपराधाबाबत दोषारोपत्र दाखल केले.

४) निशाणी क्रमांक १९ अन्वये आरोपीविरूध्द भारतीय दंड संहितेचे कलम ४४७,३२५,३२३,५०४,५०६(२) अन्वये शिक्षापात्र अपराधाबाबत आरोप निश्चित केले. उक्त दोषारोप आरोपीस मराठी भाषेत वाचून व समजावून सांगितले असता, आरोपींनी सदर दोषारोप अमान्य असल्याचे सांगून त्यांचे निवेदन निशाणी क्र.१४ व १५ अन्वये नोंदवून, संपरिक्षेची मागणी केली.

५) आरोपीची कलम ४४७,३२५,३२३,५०४,५०६(२) नुसार संपरिक्षा घेण्यात आली. आरोपींविरूध्द पुरावा आला नसल्याने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये निवेदन नोंदविण्यात आले नाही.

६) अहवालावरुन सर्व दस्तएवेजांचे अवलोकन केले दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

७) प्रकरणातील मुददे व त्यावरील माझे निष्कर्ष मी कारण मिमांसेसहित खालीलप्रमाणे नमुद करीत आहे–

| | **मुद्दे** | **निष्कर्ष.** |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्ष असे सिध्द करतो काय की, दिनांक २७/०८/२०२० रोजी मौजे लोहरा येथे १४.०० वाजेच्या सुमारास आरोपीने फिर्यादीच्या शेताता अनाधिकृतपणे प्रवेश केला आणि त्यायोगे भारतीय दंड विधान कलम ४४७ अन्वये गुन्हा केला. | ......नकारार्थी. |
| २. | उपरोक्त दिवशी, वेळी आणि ठिकाणी आरोपीने फिर्यादीच्या दंडावर काठीने मारहाण केली फिर्यादीच्या दंडाचे हाड मोडले व फ्रॅक्चर करुन इच्छापुर्वक दुखापत पोहचवली आणि त्यायोगे भारतीय दंड विधान कलम ३२५ अन्वये गुन्हा केला. ? | .......नकारार्थी. |
| ३. | उपरोक्त दिवशी, वेळी आणि ठिकाणी आरोपीने फिर्यादीस थापडाबुक्यांनी मारहाण केली, आणि त्यायोगे भारतीय दंड विधान कलम ३२३ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला. | .......नकारार्थी. |

| | | |
|---|---|---|
| ४. | उपरोक्त दिवशी, वेळी आणि ठिकाणी आरोपीने फिर्यादीस शिवीगाळ करून शांतताभंग घडवून आणण्याच्या उद्देशाने त्यांचा अपमान केला त्यायोगे भारतिय दंड विधान कलम ५०४ अन्वये गुन्हा केला. | .......नकारार्थी. |
| ५. | उपरोक्त दिवशी, वेळी आणि ठिकाणी आरोपी फिर्यादीस जिवे मारण्याची धमकी दिली. त्यायोगे भारतिय दंड विधान कलम ५०६(२)अन्वये गुन्हा केला. | .......नकारार्थी. |
| ६. | काय आदेश? | .अंतिम आदेशाप्रमाणे |

## <u>कारणमिमांसा</u>

**०८)** प्रस्तुत प्रकरणात अभियोगपक्षातर्फे एकुण ०१ साक्षीदार तपासला. सा.क्र. ०१ गजानन शिवराम सोनटक्के यांची निशाणी क्रमांक–२३ अन्वये साक्ष नोंदविण्यात आली. सदर साक्षीदाराने अभियोग पक्षास पुरक अशी साक्ष दिलेली नाही.

## <u>मुद्दा क्र.०१ ते ०५ करीता:</u>

**०९)** आरोपीने दिनांक २७/०८/२०२० रोजी मौजे लोहरा येथे १४.०० वाजेच्या सुमारास फिर्यादी गजानन शिवराम सोनटक्के हा त्याचे शेतात पाणी टाकण्याचे काम करीत होता. त्याच्या शेतात आरोपी विलास आला व त्याला उसने पैसे मागू लागला. फिर्यादीने पैसे न दिल्यामुळे आरोपीने त्याच्या दंडावर काठीने मारहाण केली. त्यामुळे फिर्यादीच्या दंडाचे हाड मोडले व फ्रॅक्चर झाले. तसेच फिर्यादीस लाथाबुक्याने मारहाण केली व जिवे मारण्याची धमकी दिली. ही बाब सिध्द करण्याची जबाबदारी अभियोगपक्षावर होती. त्याकरीता अभियोग पक्षाने सा.क्र. ०१ गजानन शिवराम सोनटक्के यांची साक्ष नोंदविली. त्यात त्याने असे कथन केले आहे की, आरोपी हा त्याचा सख्ख भाउ आहे. घटना तीन वर्षापूर्वी त्याचे शेतात घडली होती. आरोपीसोबत किरकोळ वाद झाला होता. याशिवाय काहीही घडलेले नव्हते. त्याला निशाणी क्रमांक २४ वरील फिर्यादी दाखविली त्यावर त्याची सही आहे. त्यातील मजकूर त्याला माहित नाही.

**१०)** सदर साक्षीदाराने फिर्यादी पक्षास सहकार्य न केल्याने सहायक सरकारी अभियोक्ता यांनी न्यायालयाची परवानगी घेवुन उलटपासणी घेण्यात आली परंतु, त्यात सदर साक्षीदाराने

घटना दिनांक २७/०८/२०२० रोजी दुपारी ०२.०० वाजताच्या सुमारास उसने पैशाचे कारणावरुन अरोपीने त्याला शिवीगाळ केली होती. आरोपीने काठीने डाव्या हाताच्या दंडावर व खुब्यावर मारले होते व कमरेवर मुक्का मार दिला होता. आरोपीने जिवे मारण्याची धमकी दिली होती. हया सर्व बाबी तिने नाकारल्या. उलटतपासात त्याने हे मान्य केले की, आरोपी सोबत आपसात तडजोड झाली असुन तशी तडजोड पुरसीस अहवालावर दाखल केली आहे.

**११)** वरील साक्षीदाराचे पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, आरोपी विरुध्द लावलेले आरोप अभियोग पक्षाने सिध्द केलेले नाही. म्हणुन मी मुद्या क्रमांक ०१ ते ०५ करीता नकारार्थी नोंदवित आहे.

## मुद्दा क्रमांक ०६ करीता:

**१२)** वरील कारणमिमांसेस अनुसरुन अभियोग पक्ष हा आरोपीविरुध्द भारतीय दंड संहिता कलम ४४७,३२५,३२३,५०४,५०६(२) अन्वयेचा दोषारोप सिध्द करु शकलेला नाही. त्यामुळे आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. करीता, मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१ आरोपी विलास शिवराम सोनटक्के यांना भारतीय दंड विधान कलम ४४७,३२५,३२३,५०४,५०६(२) अन्वयेच्या गुन्हयातुन कलम २४८(१) नुसार निर्दोष मुक्त करण्यात येते.

२ आरोपींचे वैयक्तिक जातमुचलके व जामीन कदबे रद्द करण्यात येतात.

३ गुन्हयातील जप्त मुददेमाल वेळुची काठी ही अपील कालावधी नंतर नष्ट करण्यात यावी.

३ आरोपीने रु.१५,०००/– चा वैयक्तिक व जामीन बंधपत्रे दयावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात श्रुतलेखीत व उद्धोषीत करण्यात येतो.)

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात श्रुतलेखीत व उद्धोषीत करण्यात येतो.)

THAKARE ISHWAR JAMSING — Digitally signed by THAKARE ISHWAR JAMSING Date: 2024.06.21 16:47:07 +0530

ठिकाण: हिंगोली.

दिनांक: २१/०६/२०२४

(आय.जे.ठाकरे),
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
न्यायालय क्र ०२ हिंगोली